# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ६९ /२०२३**

विषय: शैक्षणिक वर्ष २०२२—२३ च्या सत्र समाप्तीची मुदत वाढवून, सुट्टीचा कालावधी व शैक्षणिक वर्ष २०२३—२४ चे सत्र आरंभ बाबत...

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालय/मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२—२३ च्या वेळापत्रकातील काही किरकोळ बदल व द्वितीय सत्र समाप्तीच्या तारखा विचारात घेवून शैक्षणिक वर्ष २०२३—२४ चे सत्र आरंभाच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

१. कला, वाणिज्य व विज्ञान या पारंपारिक/अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सन २०२२—२३ या शैक्षणिक वर्षातील द्वितीय सत्राच्या समाप्तीची तारीख ही दि. ०४/०५/२०२३ अशी आहे. परंतु अपवादात्मक परिस्थितीमुळे द्वितीय सत्रातील अध्यापन विलंबाने सुरू झाल्याने परीक्षा देखील विलंबाने होत आहेत. या संदर्भात गठित करण्यात आलेल्या विविध समित्यांच्या शिफारशी विचारात घेवून शैक्षणिक वर्ष २०२२—२३ च्या द्वितीय सत्रातील समाप्तीची तारीख दि. ०४/०५/२०२३ ही वाढवून दि. १३/०५/२०२३ अशी निश्चित करण्यात येत आहे. तसेच दि. १४/०५/२०२३ ते दि. १९/०६/२०२३ हा सुट्ट्यांचा कालावधी म्हणून जाहिर करण्यात येत आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०२३—२४ चे कला, वाणिज्य व विज्ञान या पारंपारिक/अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम वर्षाच्या प्रथम सत्राचा आरंभ १२वीच्या निकालानंतर म्हणजेच दि. २०/०६/२०२३ असा राहील.

३. अपारंपारिक/व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२२—२३ च्या द्वितीय सत्र मौखिक, प्रात्यक्षिक, लेखी इ. परीक्षा दि. ०६/०६/२०२३ पासून आयोजित करण्याबाबत परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. ८४, दि. ०६/०२/२०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे या शाखांसाठी दि. २१/०५/२०२३ ते दि. ०५/०७/२०२३ हा उन्हाळी सुट्ट्यांचा कालावधी म्हणून जाहिर करण्यात येत आहे.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/ २१३७
दिनांक : ०२/०५/२०२३

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती. |
| २. | मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | |